# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 05/03/2015 (का.प.क्र.13) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक 05 मार्च 2015 रोजी (का.प.क्र.13) मा.सभापती श्री.विजय वाघचौरे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा औरंगाबाद महानगरपालिका मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.40 वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार,नगरसचिव, श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.अनिल श्रीकिशन मकरीये
03. स.स.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे
04. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
05. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
06. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
07. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
08. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा

श्री.त्र्यंबक तुपे : श्री.सुरेंद्र कुलकर्णी यांचा जन्म दिवस आहे, त्यांचे अभिनंदन व स्वागत.

मा.सभापती : जन्म दिवसाच्या शुभेच्छा

श्रीमती फिरदोस फातेमा : महिला सदस्यांकडूनही अभिनंदन. रस्ता दुभाजकाचे 2 वर्षापासून थांबलेल्या कामास आज सुरूवात झाली. शहर अभियंता श्री.पानझडे यांचे शाब्दीक अभिनंदन. मा.सभापती व सर्व सदस्यांचे, पत्रकार यांनी पाठपुरावा केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन.

श्री.त्र्यंबक तुपे : स्थायी समिती, सर्वसाधारण सभा असेल आम्ही सदस्य वार्डातील विकास कामासाठी प्रश्न, भावना मांडत असतो.वार्डातील काम झाल्यास समाधान वाटते. विकास कामासाठी सर्वाचे सहकार्य मिळत गेले. अधिकाऱ्यांचे स्वागत करतो. रस्त्याची, शाळेची दुरूस्तीची अनेक कामे चालू आहे. दीड दोन महिण्यापूर्वी सिध्दार्थ उद्यान येथील मराठवाडा मुक्ती संग्रहालय वास्तु खुले केले मराठवाड्यातून लोक तेथे येतात तेथे येणारे प्रत्येक व्यक्तीला इतिहास माहित व्हावा यासाठी हे संग्रहालय केले तेथील वास्तुची व्यवस्था साफसफाई देखभाल स्वच्छता राहिल काळजी घेणेसाठी जबाबदारी कुणावर आहे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी : महानगरपालिकेची, आमदार, खासदार, मा.पालकमंत्री सर्वांची मदत झाली. ही वास्तु उभी करत असतांना आर्थीक व इतर सर्व अडचणी आल्यात तेथील देखभाल दुरूस्ती चागंल्या प्रकारे व्हावी.

श्री.मीर हिदायत अली: मा.सभापती यांचे काळात चांगली कामे होत आहे जसे भुमिगत गटार च्या योजनेतून शहरातील सर्व स्वच्छता होत आहे,सलीम अली सरोवर अतिशय सुंदर तेथे पाणी, झाडे, पक्षी असे सर्व बघायला मिळते सुंदर वातावरण निर्माण झाले दुरवरून लोक बघण्यासाठी येत असतात.आता काही कारणास्तव 7-8 महिने पासून बंद आहे, चालू करावे तसेच आताच सुचना केल्या प्रमाणे उदयान मधील मराठवाडा मुक्ती

संग्रहालय इमारतीमध्ये देखभाल दुरूस्तीची जबाबदारी कुणावर तरी सोपवावी.ते नागरीकांना बघण्यासाठी खुले करावे.

मा.सभापती :या दोन्ही प्रकरणी संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता :मराठवाडा मुक्ती संग्राम इमारतीचे नुकतेच उदघाटन केले व सर्वासाठी खुले केले.कोणतीही वास्तु मेन्टन करायची असेल तर कर्मचा-याची आवश्यकता असते याकरीता संबधीत विभागास 10 फेब्रुवारीला पत्र दिले.सध्यातरी या विभागातीलच कर्मचारी देखभाल करतात तेथे तिकीट लावावे खर्च परस्पर निघेल असे वाटत होते. मेन्टनंस खर्च,कर्मचारी, सेक्युरीटी, व्यवस्थापक लागणार आहे.सुरक्षा विभागास पत्र दिले की या ठिकाणी दिवस रात्र सुरक्षा होण्यासाठी सेक्युरटी दयावेत.असे एकूण 9 कर्मचारी लागणार ते दिले तर खर्च वाया जाणार नाही व नागरीकांना तेथे सावकाशपणे भेटी देता येतील. सद्या आमचेच शिपायाकडून कामे घेतली जातात.

श्री.त्र्यंबक तुपे :खर्च केला, तर वास्तु सांभाळल्या पाहिजे. आस्थापना विभागास पत्र दिले कर्मचारी का दिले नाही. कितीतरी लोकांनी, विदयार्थ्यानी भेटी दिल्या नागरीक आनंद घेत आहे. काही वास्तु अशा असतात की तेथे आपण आपला इतिहास नागरीकांना दाखवत असतांना तिकीट लावुन पैसे वसुल करणे योग्य नाही.नवीन पिढीला हा इतिहास कळणे गरजेचे आहे. इतर माध्यमातून इन्कम सोर्स वाढवावे. तिकीट लावण्यास विरोध आहे. सर्व मा.आमदार व मा.खासदार लोक प्रतिनिधी यांचे माध्यमातून ही वास्तू उभी राहिलेली आहे.देखभाल दुरूस्ती चांगली व्हावी.पर्यटकांनी भेट दिली पाहिजे ही अपेक्षा करतो त्वरीत कर्मचारी तेथे दयावेत.सलीम अली हे चांगले सरोवर आहे एक प्रकारचे पर्यटन स्थळ आहे.तेही सुरू करावे.

श्रीमती फिरदोस फातेमा खान :सलीम अली सरोवर हे पक्षी प्रेमी व पक्षासाठी 9 कोटी खर्च करून एसटीपी प्लॅन्ट पाणी स्वच्छ करण्यासाठी केला.परंतु आजही बाहेरचे पक्षी येतात. 50 टक्के पाण्यामध्ये कार्बनडायक्साईड आहे हे पक्षासाठी धोकादायक ठरू शकते. दरवर्षी बाहेरील देश विदेशातून 70-80 जातीचे पक्षी येत असे व किमान 20 दिवस थांबत असे ते आलेले नाही.दुषित पाणी येते ते बंद व्हावे. 2 महिण्यापुर्वी पक्षी महोत्सव झाला. सलीम अली सरोवर येथे एकही पक्षी नजरेस आलेले नाही.केलेला प्लॅन्ट योग्य ठिकाणी झालेला नाही का? 50 टक्के घाण पाणी आहे. पक्षी पाहण्यासाठी दुर्बीन लावली होती ते आज नाही. प्लॅन्टचे कामाचे टेंडर काढले दोन वर्षाची मुदत होती काम झाले नाही मुदत वाढून दिली करोडे रूपये खर्च केले.तेथे येणारे ड्रेनेजचे पाणी बंद की चालू तसेच प्लॅन्ट बाबत सविस्तर माहिती घ्यावी.

श्री.मीर हिदायत अली :एसटीपी प्लॅन्ट चालू की बंद आहे.5 कोटी खर्च झालेले आहे.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :5 एमएलडीचे एसटीपी प्लॅन्ट आहे 24 तास कार्यरत आहे.

श्रीमती फिरदोस फातेमा खान:महाराष्ट्र प्रदुषण कन्ट्रोल बोर्ड चा रिपोर्ट होता की 50 टक्के ड्रेनेजचे पाणी वाहते. हे सत्य आहे का?

कक्ष प्रमुख (बीओटी) : सॉलीड वेस्ट व बीओटीचा प्रकल्प यात जी लेव्हल वर झाले किती झाले व कशा प्रकारे होत आहे यासाठी तज्ञाची समिती नियुक्ती केली.ई आय रिपोर्ट सादर करतील ते मा.न्यायालयात मनपा सादर करेल.त्यानंतर बायोड्राव्हरसिटी संदर्भात निर्णय घेणार जे हायजींग झाले ते आता काढण्यास प्रतिबंद केले वेळ लागणार आहे.

श्रीमती फिरदोस फातेमा खान:कमेटीचा रिपोर्ट तात्काळ घ्यावा.या वर्षी पक्षी आलेले नाही त्यांनी दुसरीकडे स्थलांतर केले ते पुढील वर्षीही येणार नाही असे होऊ नये.

श्री.मीर हिदायत अली :तेथील प्रवेश केंव्हा चालू होणार आहे.

कक्ष प्रमुख बीओटी :या संदर्भात निर्णय घेऊ शकत नाही.ई आय रिपोर्ट आल्यानंतर कार्यवाही होईल 7-8 तज्ञाची कमेटी आहे रिपोर्ट येईल मा.न्यायालयात सादर करणार त्यानंतर निर्णय घेणार आहे.

आस्थापना अधि.-1 :मराठवाडा मुक्ती संग्रहालय येथे शहर अभियंता यांनी मागणी केल्यानुसार तीन दिवसात कर्मचारी दिले जातील.

श्रीमती प्रिती तोतला :52 सुरक्षा रक्षक त्यातील काही सेवानिवृत्त झाले आता 17 सुरक्षा रक्षक आहे उर्वरीत पदाची भरती का केली नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :किती सुरक्षा रक्षक आहे पदे मंजूर कीती जे आहे त्यांचेवर  कामाचा ताण येत आहे.माहिती दयावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :57 सुरक्षा रक्षक होते आता 16-17 कर्मचारी काम करतात अनेक ठिकाणी वास्तु उभारल्या मराठवाडा मुक्ती संग्रहालय केले त्या वास्तुचे पावित्र्य राखले पाहिजे. सुरक्षा रक्षक आवश्यक आहे ही काळजी घेतली पाहिजे.तेथील देखभाल कशी होईल ते पहावे. तीन दिवसात कर्मचारी कोठून देणार,संचिका केली का, आयुक्ताकडे हे प्रकरण गेले का, चुकीची माहिती देऊ नये, स्पष्ट सांगावे. रिक्त पदे भरली नाही यात गंभीरतेने घेतलेले दिसत नाही. किती कर्मचारी आहे कोठे सेक्युरिटी देतो इतर पदे तातडीने भरली जातात ही का नाही त्यांची वेतनश्रेणी बाबत कार्यवाही होत नाही.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :मराठवाडा मुक्ती संग्रहालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक आहे.

श्री.मीर हिदायत अली :आस्थापना विभाग वेळेवर काम करीत नाही अनेक रेकॉर्ड त्यांचेकडे नाही शासनाकडील अधिकारी येतात त्यांचे मुदतवाढीस मंजूरी घेत नाही शासनाकडील किती अधिकारी आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :निर्णय घेतला जातो परंतु कार्यवाही होत नाही.आयुक्ताचे प्रतिनिधी म्हणून अति.आयुक्त येथे आहे जे निर्णय होतात त्याची अमलबजावणीचे अधिकार अति.आयुक्त यांना  माझ्या माहिती प्रमाणे असू शकतात. 4-5महिण्यात जे निर्णय झाले त्यावर काय अमबजावणी केली 43 (5) कलमा नुसार स्थायी समिती कामकाजाचे अधिकार स.आयुक्त व त्याचे अनुपस्थितीत त्याने प्राधिकृत केलेल्या उपआयुक्तास किंवा सहा.आयुक्त,परीवहन व्यवस्थापन व त्यांचे अनुउपस्थित त्याने या बाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकारास परिवहन समितीच्या किंवा उपसमितीच्या सभेत उपस्थित राहण्याचा व तीत होणा-या चर्चेत भाग घेण्याचा सदस्यास जो अधिकार असेल तोच त्यांना असेल असे म्हटले जे आयुक्ताचे प्रतिनिधी म्हणून सभेला असतात त्यांना निर्णय घेण्याचे अधिकार आहे की नाही विधी विभागाचा सल्ला घ्यावा.

श्री.मीर हिदायत अली :कुत्रे पकडण्याची एकच गाडी चार लेबर आहे चार गाडया व एक गाडीवर  5-5 लेबर पाहिजे.निर्णय घेतो अमलबजावणी होत नाही.

नगरसचिव :मा.आयुक्त ज्या सभेला उपस्थित असणार नाही त्यांनी ज्या अधिका-यांना प्राधिकृत केले त्या अधिका-यांना आयुक्तांना जो अधिकार असतो तोच अधिकार त्यांना प्राप्त होतो अशी या कायदयाची तरतूद .सेक्शन 43 (5) मध्ये दिले.

श्री.त्र्यंबक तुपे :असे असतांना मला अधिकार नाही असे वारंवार अति.आयुक्त सांगतात. कायदयाने अधिकार दिले असतांना नाकारतात. 5-6 महिण्यात निर्णय घेतले त्याची

अमलबजावणी का होत नाही.तर त्या अधिका-यांचे आयुक्ताचे प्रतिनिधी म्हणून येथे काय काम मा.आयुक्तांची भुमिका अधिकारी पार पाडत नाही आरोप आहे.

अति.आयुक्त : मा.आयुक्ताच्या ऐवजी किंवा आयुक्तांनी जे मला येथे बसण्याचे अधिकार दिले त्यानुसार बसतो.जे निर्णय होतात त्याची अमलबजावणी करण्यासाठी त्या त्या विभागाला आदेशीत केले जाते.यात विभाग प्रमुखाने कार्यवाही केली पाहिजे.

श्री.त्र्यंबक तुपे :मागिल बैठकीत कुत्रे पकडण्यासाठी व्हॅन, चा विषय झाला पाहतो,करतो अशी उत्तरे दिली.

अति.आयुक्त :व्हॅन संदर्भात अधिका-याशी चर्चा केली जे कुत्रे पकडतात ते कर्मचारी ट्रेन्ड पाहिजे असे म्हटले चार गाडया देण्याची कार्यवाही चालू आहे.

श्री.मीर हिदायत अली :कुत्रे कसे पडकायचे प्रशासनाने ठरवावे.

श्री.त्र्यंबक तुपे :यापुर्वी उपआयुक्त सभेला होते त्यांनी निर्णय घेतले अति.आयुक्त निर्णयच घेत नाही. जे जे मुद्दे चर्चेला येतात त्यावर काय कार्यवाही केली.प्रत्येक काम आयुक्तांनी करायचे खालचे अधिकारी उपआयुक्त काय काम करतात.ज्याचे त्याचे काम त्यांनी केलेच पाहिजे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :कुत्रे पकडले जात नाही वारंवार विषय समोर येतो नागरीक आम्हाला हिणवतात या बाबत गार्भीय नाही.

श्रीमती फिरदोस फातेमा खान : दोन वर्षापासून नुसती चर्चा व निर्णय होतो परंतु लिखीत कार्यवाही होत नाही. किती व्हॅन, कर्मचारी लागणार हे स्पष्ट आयुक्तानी निर्देशीत करावे अति.आयुक्त यांना अधिकार आहे त्यांनी त्यांचे अधिकाराचा वापर करावा.नागरीकांनामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. कुत्र्यांचा त्रासामुळे नागरीकांना बाहेर निघणे कठीण झाले, स्वाईन फ्ल्यू होतो,कुणी मुलांना पकडून नेत आहे या विविध घटनामूळे नागरीक सुरक्षित नाही.जे जे निर्णय होतात त्यांची तातडीने अमलबजावणी केली पाहिजे.

श्रीमती प्रिती तोतला :कुत्रे पकडण्यास ट्रेनिंग लागते म्हणुन कुत्रे पकडत नाही परंतु लाईटची सुध्दा कामे होत नाही येथे ट्रेनिगंची गरज नाही. लाईट ड्रेनेज चोकअप साफसफाई अशी किरकोळ कामे तरी व्हावी.

मा.सभापती :सुरक्षा रक्षकाच्या संदर्भात खुलासा करावा.

आस्थापना अधि-2 : 55 पदे, 24 भरलेली आहे व 31 रिक्त आहे. संचिका सादर केली बिंदू नामावली तपासणी करून आयुक्त कार्यालयाकडून प्रमाणित करून घ्यावी लागते. त्यानंतर जाहिरात देऊन पदे भरण्याचे काम केले जाईल. सुरक्षा रक्षकाच्या वेतननिश्चिती बाबत सविस्तर अहवाल तयार करून शासनास पाठविला, दोनदा क्युरीज काढल्या त्याची पुर्तता केली. शासनाकडे प्रकरण असतांना 2014 मध्ये सुरक्षारक्षक श्री.शेख यांनी एक कन्टेम पिटीशन कोर्टात दाखल केले. सहा महिण्यात निर्णय घेण्याचे मा.कोर्टाने आदेशीत केले. शासनाने मनपास पुन्हा 12 प्रश्नाची माहिती मागितली त्या संबधी पुर्ण माहिती पाठविली.पुर्ण प्रस्ताव तयार करून दिला शासनाची मान्यता नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :2008 मध्ये प्रस्ताव घेतला 7 वर्षात कार्यवाही नाही.शंका घेणे इतपत काम केले. अधिका-यांच्या पदास आठ दिवसात मान्यता येते यास 7 वर्ष झाले दोन कर्मचारी निवृत्त झाले तरी वेतननिश्चिती झाली नाही.त्यांचे वेतननिश्चितीनुसार वाढीव रक्कम कपात केली एकास एक व दुस-यास वेगळा न्याय मिळतो 1124 मधील

कर्मचा-यांना सेवापट दिले प्रशासनाचे धन्यवाद देतो.आस्थापना विभागाचे काम चांगले चालावे अशी अपेक्षा आहे.31 जागा का रिक्त राहिल्या सुरक्षा विभाग सक्षम आहे. आपल्या विभागाची मालमत्तेची सुरक्षा होते.शासनाकडे प्रशासनाने पाठपुरवा करावा सर्वांना समान न्याय दयावा माझ्या माहिती प्रमाणे 150-200 कर्मचारी कार्यरत पाहिजे.दुसरे पदाचे कर्मचारी सुरक्षा रक्षक म्हणून दिले जाते आताच म्हटले शेख नावाचे कर्मचारी कोर्टात गेले. ही वेळ का आली.किती सुरक्षा रक्षकाची गरज आहे. रिक्त पदे भरावी सर्वांना सारखा न्याय दयावा.दुसरा विषय घेतो की खाराकुंवा गुजराती हास्कूलच्या बाजूला मनपाच्या एका जागेवर तिस-या व्यक्तीने पीआर कार्ड बनवले.त्याकडे कुणाचे लक्ष नाही.जे सदस्य सागंतात तेतरी कामे करावे.किती सुरक्षा रक्षकाची गरज आहे.त्याजागा कशा भरता येतील यासाठी कार्यवाहीचे आदेशीत करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :मोर्चे, निदर्शणे,घेराव अंदोलन होत असतात पोलीस प्रमाणे सुरक्षारक्षकांना काम करावे लागते.शहरात नवीन वास्तु,संग्रहालय ,आरोग्य केंद्र,गार्डन अशा प्रकारे काही जागा डेव्हलप होत असतांना त्यासाठी सुरक्षा रक्षकाची गरज पडते.हे कर्मचारी कमी असल्याने मध्यतंरी खाजगी एजन्सीला काम दिले होते.त्यामुळे मनपाकडे किती कर्मचारी असावे रिक्त पदे किती प्रश्नमागे पडला.किती कर्मचारी असावे याबाबत प्रशासनाने स्वत:हून शासन स्तरावर कार्यवाही करायला पाहिजे.महत्वाचा विभाग आहे.हे शहर मोठे होत आहे वार्ड वाढले असतांना त्या प्रमाणात कर्मचारी वर्ग कमी पडतो.वर्ग 1 ते 4 पर्यत किती कर्मचारी लागतात शासनाकडे मागणी करणार का माहिती दयावी.

आस्थापना अधि.-1 :वर्ग-1 चे 14 मंजूर पदे 12 भरलेली ,वर्ग 2 चे 20 पदे रिक्त,वर्ग -3 चे 259 पदे रिक्त एकूण 281 पदे रिक्त आहे.शासन सुचनेनुसार आकृतीबंध तयार करीत आहोत आजच विभागाकडे परीपत्रक पाठवले,कार्यरत किती व नव्याने किती पदाची आवश्यकता आहे माहिती घेत आहोत.या संदर्भात नगरविकास विभागाशी चर्चा झाली.15 दिवसात अहवाल दिला जाईल.

श्री.त्र्यंबक तुपे :सभेत याची चर्चा व्हावी अशी अपेक्षा करू नये कर्मचा-याची गरज आहे. संबधीत विभागाने एकत्रित बसून तातडीने निर्णय घ्यावेत.

मा.सभापती :कधी पासून ही पदे रिक्त आहे.

आस्थापना अधि-1 :ती माहिती सध्या नाही. जुन 2011 मध्ये पदे भरणे बाबत जाहिरात काढली त्या संदर्भात.संगणक ऑपरेटर यांनी मा.कोर्टाचे स्टे आणला ते आजही दैनिक वेतनावर कार्यरत असून त्यांची कायम स्वरूपी सेवेत घेणे बाबत मागणी होती.

श्री.काशिनाथ कोकाटे:सन 2006 मधे जाहीरात दिली होती त्यात मनपाचे दै.वेतन कर्मचारी यांना परीक्षा व मुलाखत देण्याची संधी व वयाची अट सुध्दा शिथील करणार असे होते त्याप्रमाणे 2011 च्या जाहीरातनुसार या कर्मचा-यांना अगोदर तसे कळविले का ?

आस्थापना अधि.-1 :2008 मधे दै.वेतन कर्मचा-यांचा प्रस्ताव पाठविलेला आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :जी रिक्त पदे आहे ती भरण्याची शासनाकडे मागणी करावी.

आस्थापना अधि.-1 :विभागाकडून माहिती येऊ दयावी असे उपआयुक्त यांची सुचना आहे.संबधीत अधिकारी यांनी एकत्रित बसून निर्णय घ्यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :या संबधीत किती वेळा निवड समितीची बैठक झाली. माझ्या माहिती प्रमाणे समितीची बैठक होत नाही. वैयक्तिक प्रस्ताव असेल तर समितीचे सदस्याच्या सहया घेतल्या जातात.संस्थेचे हित पाहणे प्रशासनाची जबाबदारी आहे.

आस्थापना अधि.-1 :रिक्त पदासाठी जाहीरात दयावी लागते.

श्री.काशिनाथ कोकाटे :रिक्षा चालक व इतर वाहन चालकाची 13 पदे रिक्त आहे जेसीबी चालक एक पद रिक्त आहे.

आस्थापना अधि.-1 :सरळ सेवेची 30 पदे पदोन्नतीने 11 पदे भरायची आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :केंव्हा पासून रिक्त आहे मा.आयुक्त गुप्ता साहेब असतांना जाहिरात दिली त्यावेळी वाहनचालक पदासाठी वयाची अट शिथील केली होती. 7 वर्षापासून का कार्यवाही केली नाही.

आस्थापना अधि.-1 :सन 2007 मध्ये 57 पदाची भरती केली त्यावेळी 19 वाहनचालकाची पदे भरलेली होती त्यानंतर मा.आयुक्त यांनी दै.वेतनावरील वाहनचालक याची वयाची अट शिथील करून सेवेत घेणे बाबत आदेश होते त्यानुसार 2011 ला रिक्त पदाचा आढावा घेवून जाहीरात दिली त्यानुसार ती पदे भरण्यास सर्वसाधारण सभेने स्थगिती दिली.

श्री.काशिनाथ कोकाटे:कोणत्या कारणामूळे स्थगिती दिली माहिती घेवून कार्यवाही करावी.

मा.सभापती :महासभेने स्थगित करण्याचा ठरावाची प्रत दयावी आस्थापनाने काय माहिती सादर केली दोन्ही आस्थापना विभागाने समन्वय ठेवून काम करावे तसेच मराठवाडा मुक्ती संग्रहालयामध्ये 3 सुरक्षारक्षक, 3 मजूर ,एक वरिष्ठ,कनिष्ठ लिपीक ,एक शिपाई असे 9 कर्मचारी तातडीने देण्यात यावे.

श्री.मीर हिदायतअली :आमच्या वार्डात 6-7 दिवसाआड येणारे पाणी आता 3 दिवसाआड येत आहे. सिटीमध्ये 2 दिवसा आड पाणी येते तसे आमच्या वार्डात यावे. मनपाचे संबधीत अधिकारी शहर अभियंता यांचे सुचनेनुसार टाकीच्या ठिकाणी आले सर्व नागरीकांना समजावून सांगून मार्ग काढला चांगले काम केले तर चांगले बोलले पाहिजे. श्री.पदमे व कार्य.अभियंता श्री.कोल्हे यांना एक अगाऊ वेतनवाढ देण्यात यावे.

मा.सभापती :विशेष बाब म्हणून नियमानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र. 130 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला हडको परीसरातील रिमांड होमच्या समोरील सिडको कार्यालयाकडून महानगरपालिकेस हस्तांतर झालेली जागा ज्याचा वापर खेळाचे मैदान असा दर्शविलेला असुन ही जागा सचिव सद्‌गुरू साईलिला बहुउद्देशिय संस्था यांनी भाडेतत्वावर मिळणेसाठी विनंती केली आहे. सदरील जागेचे क्षेत्रफळ 5744.28 चौ.मी. असुन सन 2014 च्या शिध्द शिघ्र गणकानुसारचे भाडे रू.5,17,500/- प्रतिमाह (इतर कर वेगळे) एवढे होते. सदरील जागेवर खेळाचे मैदान तयार करून त्याठिकाणी झाडे लावुन लॉन टेनिस इ. साठी खेळपट्टी तयार करून संस्थेकडून क्रिडा प्रशिक्षण कार्यक्रम स्पर्धा घेणे इ. चा उपक्रम राबविण्यात येणार असल्याबाबत संबंधीत संस्थेने कळविले आहे. तसेच सदरील जागा ही खेळाचे मैदान असल्याने मैदानाची निगराणी राखली जाईल. त्यानुसार सदरील जागा संस्थेस प्रथम तीन वर्षाकरीता भाडेतत्वावर देणेसाठी प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

त्यानुषंगाने सचिव सद्‌गुरू साईलिला बहुउद्देशिय या संस्थेस सदरील जागा महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधिन राहुन देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

श्री.काशिनाथ कोकाटे :प्रस्ताव कुणी ठेवला आहे.

उपआयुक्त(मा.म) :प्रशासनाच्या मार्फत मालमत्ता विभागाकडून प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :या प्रस्तावानुसार 13 लक्ष लोकसंख्या असलेले या शहरात माझ्या माहिती प्रमाणे अनेक बहुउद्देशीय संस्था येथे असतील.पेपरमध्ये जाहिरात देऊन यासाठी मागणी केलेली आहे काय ?

श्री.त्र्यंबक तुपे : संस्थेने हे भाडे मान्य करूनच ठराव आला असावा व इतर कर वेगळे असे म्हटले ते मिळून हे भाडे संस्थेने मान्य केले का ?

श्री.मीर हिदायत अली :दीड एकर जागा आहे 5.17 लक्ष दर महा भाडे आहे संस्थेने हे भाडे देण्यास मान्य केले का?

मालमत्ता अधिकारी :सस्थेचा प्रस्ताव आल्यानुसार संचिका सादर केली शिध्द शिघ्र गणकानुसार भाडे आकारण्यास प्रशासकीय मंजूरी आहे.एवढे भाडे देणार का हे संस्थेला माहित नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :दीड एकर जागा संस्थेला देणार तेथे बांधकाम करेल प्लॉट करून विक्री करेल असा प्रकार यात आहे का?

श्री.काशिनाथ कोकाटे : सिडकोने मनपास ही जागा 30 वर्षाच्या लिजवर दिली.या प्रमाणेच टीव्ही सेंन्टर येथील जागेवर शॉपींगचे काम दिले होते ते आता थांबले आहे.सिडकोची परवानगी लागते तसेच हे प्रकरण आहे.सर्व प्रोसेस करणार करार होणार, सिडकोची परवानगी घ्यावी लागते.लिजवर देता येत नाही ज्यासाठी जागा आहे त्याच कामासाठी ठेवावी लागणार आहे.

विधी सल्लागार :मनपाची कुठली ही जागा लिजआऊट करण्या संबधी कोर्टात प्रकरण झाले 25 ऑगस्ट 2014 व 8 जुलै 2014 च्या निर्णयाप्रमाणे डायरेक्शन दिले आहे. जागा देत असतांना कलम 79 नुसार महापालिकेने पेपरला जाहिरात दयायला पाहिजे. तसेच पारदर्शक कार्यपध्दतीचा अवलंब करावा त्याशिवाय जागा देता येणार नाही. जागेचे भाडे मार्केट प्राईज किंवा रेडीरेकनर रेट प्रमाणे व जागेची मागणी सर्व समावेशक असावी इतरांचा विचार करावा एकाची मागणी आली म्हणून देता येणार नाही असे म्हटले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :अपुर्ण प्रस्ताव आहे प्रशासनाने परत घ्यावा.

अति.आयुक्त :पुर्ण प्रोसेस करून सभागृहासमोर आणण्यात येईल. फार्मली प्रस्ताव परत घेत आहोत.

मा.सभापती :प्रस्ताव परत घेण्यात यावे.

श्री.मीर हिदायत अली:1124 मधील 507 कर्मचारी यांना सेवापट दिले नाही.14 कर्मचारी यांचे थोडेशा चुकीमुळे कार्यवाही केली ते परत कामावर घ्यावे त्यांना न्याय दयावा.

आस्थापना अधि.-1 :2007 मध्ये विविध कारणामुळे व त्या संबधीत तारांकित प्रश्न उपस्थित झालेला होता त्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :सदर कर्मचारी यांनी मा.कोर्टात प्रकरण दाखल केले का ?

आस्थापना अधि.-1 :लेबर कोर्टात प्रकरण होते त्याची मागणी मा.कोर्टाने फेटाळली आता मा.उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनाने परत घेतला. त्यास मंजुरी देण्यांत आली.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 131 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मयत श्री.धोंडीराम राठोड, सफाई मजुर, वॉर्ड-ब येथे कार्यरत होते. स्वतः च्या मेंदुच्या आजाराकरीता एम.जी.एम. वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे उपचार घेत असतांना मृत्यु झालेला आहे. मृत कर्मचारी यांची पत्नी श्रीमती सुलाबाई धोंडीराम राठोड यांनी उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देण्याची मागणी केलेली आहे.

अर्जदाराने आवश्यक त्या विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून त्यांना मेंदुच्या उपचारार्थ एकूण खर्च रू.451484/- झालेला आहे. यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.77508/- वजा जाता रू.351484/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90 टक्के रक्कम रू.336575/- इतकी होते. एकूण खर्चाचा 5 टक्के रू.22574/- मनपा फंडात जमा करून व अग्रीम म्हणुन रू.100000/- वजा जाता रू.2,14,004/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

करिता रक्कम रू.214004/- मयत श्री.धोंडीराम हेमराज राठोड, सफाई मजूर, वॉर्ड-ब यांची पत्नी श्रीमती सुलाबाई धोंडीराम राठोड यांना अदा करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

चर्चा :

मा.सभापती :प्रत्येक प्रभाग कार्यालयात जन्म-मृत्यू संदर्भात एक सारखीच फिस आकारण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :यापूर्वी वेगवेगळी फिस घेत होतो का ?

आरोग्य वैद्य.अधिकारी :वार्ड अधीकारी यांना रजिस्ट्रार म्हणून अधिकार दिले आहे जन्म-मृत्यूची फिस ही शासनाचे गॅजेट असते त्याप्रमाणे आकारावी लागते त्यात कुणी बदल करू शकत नाही. या बध्दलची तक्रार प्राप्त नाही.

श्री.संजय चौधरी :संबधीत विभागाकडे तक्रार नाही प्रस्ताव आला कसा?

मा.सभापती : ऐनवेळचे विषय आहेत, ते दुरूस्तीसह मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मयत श्री.धोंडीराम राठोड, सफाई मजुर, वॉर्ड-ब यांच्या मेंदुच्या आजाराकरीता एम.जी.एम. वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे केलेल्या उपचारार्थ अनुज्ञेय र.रू.351484/- रक्कमेच्या 90 टक्के रक्कम रू.336575/- मधून एकूण खर्चाच्या 5 टक्के रू.22574/- मनपा फंडात जमा करून व अग्रीम म्हणुन रू.100000/- वजा जाता उर्वरीत र.रू.2,14,004/- संबंधीतास अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 132 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.25 सिडको एन/7 येथील हॉटेल सनी ते ओंकार गॅस एजन्सी पर्यंतच्या रस्त्याचे WHITE TOPPING कॉंक्रीटीकरण करणे. या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन 2013-2014 च्या दरसुचीनुसार र.रू.1,13,07,300/- चे अंदाजपत्रकास मान्यता होऊन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता, एकुण (04) चार निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|
| 01. | मे.आर.के. कन्स्ट्रक्शन | 9.1 % कमी दराने |
| 02. | मे.एम.एस.पटेल कन्स्ट्रक्शन | 1.99% जास्त दराने |
| 03. | मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन | 11.11% जास्त दराने |
| 04. | एम.ए.सिद्दीकी | 12.67% जास्त दराने |

करीता वरील प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी दराची निविदा मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची असून, ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.1% कमी दराची आहे. त्यास दिनांक 05/03/2015 चे मान्यतेनुसार मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

तथापी मे.आर.के. कन्स्ट्रक्शन यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.1% कमी दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.25 सिडको एन/7 येथील हॉटेल सनी ते ओंकार गॅस एजन्सी पर्यंतच्या रस्त्याचे WHITE TOPPING कॉंक्रीटीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.1% कमी दराची दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 133 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी 14 ट्रॅक्टर्स सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.116 दिनांक 27/02/2015 नुसार रक्कम रूपये 32,47,608/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार या कामासाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदांपैकी सर्व तीनही निविदाधारकांनी तांत्रिक निविदेच्या अटी शर्तीची पुर्तता केली आहे. त्याप्रमाणे या तीन निविदाधारकांची व्यापारी निविदा उघडण्यात आली असुन प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर दर |
|---|---|---|
| 01. | मे.के.ए. घुगे | रूपये 1949/- |
| 02. | मे. पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल ॲन्ड लेबर सप्लायर्स | रूपये 1925/- |
| 03. | मे. गुरूदत्त ट्रान्सपोर्ट | रूपये 1989/- |

प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या मे.पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल ॲन्ड लेबर सप्लायर्स यांचे दर सर्वात कमी असुन, हे दर अंदाजपत्रकीय दर (प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर रूपये 1487/-) पेक्षा प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर रूपये 438/- ने जास्त आहेत. निविदेद्वारे प्राप्त दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त असल्यामुळे वाटाघाटी करण्यात आल्या असता मे. पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल ॲन्ड लेबर सप्लायर्स यांनी प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर रूपये 1869/- दराने काम करण्यास तयारी दर्शविली आहे.

करीता घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी 14 ट्रॅक्टर्स सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी मे. पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल ॲन्ड लेबर सप्लायर्स यांच्या प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर रूपये 1869/- दर संबंधीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी 14 ट्रॅक्टर्स सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल ॲन्ड लेबर सप्लायर्स यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम संबंधीत एजन्सीमार्फत प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर रूपये 1869/- या दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 134 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी 9 टिप्पर्स सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.115 दिनांक 27/02/2015 नुसार रक्कम रूपये 46,26,180/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार या कामासाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता एकुण सहा निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदांपैकी पाच निविदाधारकांनी तांत्रिक निविदेच्या अटी शर्तीची पुर्तता केली आहे. त्याप्रमाणे या पाच निविदाधारकांची व्यापारी निविदा उघडण्यात आली असून प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्रतिदिन प्रति टिप्पर दर |
|---|---|---|
| 01. | मे.के.ए. घुगे | रूपये 3825/- |
| 02. | मे. शे समद शे मदन | रूपये 2900/- |
| 03. | मे. गुरूदत्त ट्रान्सपोर्ट | ---- |
| 04. | मे न्यु साधना इंजि. वर्क्स | रूपये 3790/- |
| 05. | मे प्रभाकर गणपतराव मोहिते | रूपये 3200/- |

प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या मे.शे.समद शे.मदन यांचे दर सर्वात कमी असुन, हे दर अंदाजपत्रकीय दर (प्रतिदिन प्रतिटिप्पर रूपये 3295/-) पेक्षा प्रतिदिन प्रतिटिप्पर रूपये 395/- ने कमी आहेत. प्राप्त दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यामुळे निविदा स्विकृत करणे योग्य होईल.

करीता घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी 09 टिप्पर्स सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी मे शे समद शे मदन यांच्या प्रतिदिन प्रतिटिप्पर रूपये 2900/- दर संबंधीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी 9 टिप्पर्स सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.शे.समद शे.मदन यांचेकडून सदरील काम प्रति दिन प्रति टिप्पर रूपये 2900/- या दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 135 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा संकलनाच्या कामासाठी महानगरपालिकेचे ॲटोटिप्पर्स व हायड्रोलिक हॉपर्स पुरेसे नसल्यामुळे 20 लोडींग ॲटो सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी रक्कम रूपये 24,52,320/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देवून जाहिर निविदा मागविण्यात आल्या असता तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.
निविदाधारकांनी खालीलप्रमाणे दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | प्रतिदिन प्रति लोडींग ॲटो दर |
|---|---|---|
| 01. | मे ॲक्टीव्ह मोटर्स | रू.1150/- |
| 02. | मे न्यु साधना इंजिनिअरिंग वर्क्स | रू.1245/- |
| 03. | मे के. ए. घुगे | रू.1260/- |

प्राप्त निविदांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या मे ॲक्टीव्ह मोटर्स औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी व रूपये 1150/- प्रतिदिन प्रति लोडींग ॲटो असे होते. सदरील दर जास्तीचे वाटत असल्यामुळे निविदेतील दरा बाबत वाटाघाटी केल्या असता वाटाघाटी अंती प्रतिदिन प्रतिलोडींग ॲटो रूपये 1100/- दराने काम करण्यास सदरील एजन्सीने सम्मती दर्शविली आहे. या कमी केलेल्या दरानुसार 20 लोडींग ॲटो सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी रक्कम रूपये 34,32,000/- खर्च अपेक्षित आहे.

करीता घनकचरा संकलनाच्या कामासाठी मे ॲक्टीव्ह मोटर्स औरंगाबाद यांचेकडून 20 लोडींग ॲटो प्रतिदिन प्रतिॲटो रूपये 1100/- दराने सहा महिने कालावधीसाठी किरायाने घेण्यास व अपेक्षित रक्कम रूपये 34,32,000/- च्या खर्चाचा प्रस्ताव अवलोकनार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा संकलनाच्या कामासाठी मनपाचे ॲटोटिप्पर्स व हायड्रॉलीक हॉपर्स पुरेसे नसल्यामुळे 20 लोडींग ऑटो सहा महिने कालावधीकरीता किरायाने घेण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे प्रतिदिन प्रति ॲटो रू.1100/- या दराने मे.ॲक्टीव्ह मोटर्स, औरंगाबाद यांचेकडून सहा महिने कालावधीसाठी किरायाने घेण्यास व त्यासाठी लागणाऱ्या अपेक्षीत र.रु.34,32,000/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 136 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किट अंतर्गत घाटी चौक (ज्युब्लीपार्क) ते पाणचक्की या रोडवर पथदिवे व्यवस्था करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाच्या सन 2013-14 दरसुचीनुसार रक्कम रु.63,25,853/-च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता होऊन सदर कामासाठी निविदा सुचना क्र./ई-निविदा/457/2015 दिनांक 29/01/2015 अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता,एकुण चार (04) निविदा दराचा भरणा करुन प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे.

1. मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल --- 28.5% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने
2. मे.सोनु इलेक्ट्रीकल --- 17.86%अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने
3. मे.स्टर्लिग इलेक्ट्रीकल वर्क्स --- 13.95% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने
4. मे.मातोश्री इले ॲन्ड वा.वर्क्स --- 5.2% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने

वरील प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 28.5% कमी दराने मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल, यांची निविदा आहे. त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 28.5% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किट अंतर्गत घाटी चौक (ज्युब्लीपार्क) ते पाणचक्की या रोडवर पथदिवे व्यवस्था करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 28.5% कमी दराची मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 137 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किट अंतर्गत मकाईगेट ते बिबिका मकबरा या रोडवर पथदिवे व्यवस्था करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाच्या सन 2013-14 दरसुचीनुसार रक्कम रु.26,44,760/-च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता होऊन सदर कामासाठी निविदा सुचना क्र. /ई-निविदा/ 457 / 2015 दिनांक 29-01-2015 अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता, एकुण चार (05) निविदा दराचा भरणा करुन प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे.

1. मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल --- 31.5% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने
2. मे.सोनु इलेक्ट्रीकल --- 26.77% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने
3. मे.स्टर्लिग इलेक्ट्रीकल वर्क्स --- 20 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने
4. मे.ईगल इलेक्ट्रीकल --- 5 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने
5. मे.मातोश्री इले ॲन्ड वा.वर्क्स --- 12.2% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने

वरील प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 31.5% कमी दराने मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल, यांची निविदा आहे. त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 31.5% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किट अंतर्गत मकाईगेट ते बिबिका मकबरा या रोडवर पथदिवे व्यवस्था करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 31.5% कमी दराची मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.138 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद सेफ सिटी प्रोजेक्ट राबविण्याच्या दृष्टीने दिनांक 16/01/2015 रोजी मा.पोलीस आयुक्त यांचे सभागृहात मा.गृहराज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे उपस्थितीत मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद, मा.पोलीस आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, पोलीस अधिक्षक, औरंगाबाद (ग्रामिण) यांच्या समवेत बैठक संपन्न झाली. बैठकीतील चर्चेनुसार औरंगाबाद शहर हे महाराष्ट्रातील पाचव्या क्रमांकाचे शहर असुन, औरंगाबाद शहरातील वाळुज, चिकलठाणा, शेंद्रा, पैठण

एमआयडीसी सारख्या औद्योगिक वसाहतीमुळे औरंगाबाद शहराच्या लोकसंख्या वाढीचा दर देशाच्या सरासरी वाढीपेक्षा दुपटीपेक्षा जास्त आहे. यामुळे गुन्हेगारीत होणारी वाढ, वाढणारे अपघात, वाहतुकीच्या सुरक्षेचा व देशाला भेडसावणारा दहशतवादाचा धोका इत्यादींचा सामना करण्यासाठी नविन तंत्रज्ञानाची मदत घेण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. त्यादृष्टीने शहरात औरंगाबाद सेफ सिटी प्रकल्प मा.पोलीस आयुक्त कार्यालयातर्फे आणि महानगरपालिकेच्या सहकार्याने राबविण्याचा निर्णय झाला असून, त्याचे विवरण खालीलप्रमाणे.

01. औरंगाबाद सेफ सिटी प्रकल्प राबविण्याकरीता महानगरपालिका, औरंगाबाद यांचेकडे सादर प्रकल्प उभारणीचे काम सोपविण्याचा निर्णय झाला.
02. प्रकल्पासाठी लागणारा निधी डी.पी.डी.सी. मार्फत पुरविण्यात येईल असे ठरले.
03. या प्रकल्पाकरीता तांत्रिक सल्लागाराची (Consultant) नेमणुक करून पुढील कार्यवाही करावी असे ठरले.
04. प्रोजेक्टकरीता पोलीस खात्यातर्फे समन्वयक (Co-ordinator) म्हणुन पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) हे राहील, असे ठरले.

या प्रकल्पा अंतर्गत शहरात आवश्यक त्या ठिकाणी (अ) सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे (ब) पब्लिक ॲड्रेस सिस्टीम (क) आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा (ड) व्हेईकल ट्रॅकींग सिस्टीम (इ) कम्युनिकेशन सिस्टीम (दळणवळण) (फ) कमांड कंट्रोल रूम उभारणे इ. वाहतुक सुरक्षेच्या दृष्टीने उपाय योजना करण्याचा समावेश आहे. सदर कामे महानगरपालिका मा.पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयाशी योग्य समन्वय ठेऊन दोन टप्प्यामध्ये पूर्ण करणार आहे. सदर प्रकल्प राबविण्यासाठी दिनांक 21/02/2015 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक 757 अन्वये मान्यता झाली आहे. त्यानुसार सदर प्रकल्पातील कामे करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक प्रकल्प सल्लागार यांची नियुक्ती करणेसाठी निविदा सूचना जा.क्र.मनपा/ईनिविदा/517/2015 दिनांक 25/02/2015 अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | मे.महा इन्फोटेक प्रा.लि., मुंबई | - | प्रकल्प किमंतीच्या 3% दराने. |
| 02. | मे.भक्ती कॉम्प्युटर्स, औरंगाबाद | - | प्रकल्प किमंतीच्या 5% दराने. |
| 03. | मे.समर्थ सेक्युरीटी सिस्टीम इंडिया प्रा.लि., मुंबई | - | प्रकल्प किमंतीच्या 5.5% दराने. |

उक्त प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची मे.महा इन्फोटेक प्रा.लि., मुंबई यांची प्रकल्प किमंतीच्या 3% दराने आहे. तरी मे.महा इन्फोटेक प्रा.लि., मुंबई यांची प्रकल्प किमंतीच्या 3% दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद सेफ सिटी प्रकल्प या प्रकल्पा अंतर्गत शहरात आवश्यक त्या ठिकाणी (अ)सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे (ब)पब्लिक ॲड्रेस सिस्टीम (क)आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा (ड)व्हेईकल ट्रॅकींग सिस्टीम (इ)कम्युनिकेशन सिस्टीम(दळणवळण) (फ)कमांड कंट्रोल रूम उभारणे इ. वाहतुक सुरक्षेच्या दृष्टीने उपाय योजना करणे ही सदर प्रकल्पातील कामे करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक प्रकल्प सल्लागार यांची नियुक्ती करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच प्रकल्प किमंतीच्या 3% दराची मे.महा इन्फोटेक प्रा.लि., मुबई यांची निविदा स्विकारणे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.139 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मौजे गारखेडा येथील न.भु.क्र.15306/1 रिलायन्स मॉल लगतचे इमारतीमधील समावेशक आरक्षण विकासातंर्गत एकुण बांधकामापैकी 2447.00 चौ.मी. ऐवढे क्षेत्रफळ महानगरपालिकेस हस्तांतरीत केले आहे. या बांधकाम G+3 असुन यामध्ये एकूण 16 हॉल/दुाकने आहेत. हॉलचे / दुकानांचे प्रत्येकी क्षेत्र

साधारणत: 153.00 चौ.मी. एवढे आहे. बांधकाम झालेली इमारत मधील पूर्वेकडील तळमजला हॉल साई सेवा बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद यांनी भाडे तत्वावर मिळणेसाठी विनंती केली आहे. साई सेवा बहुउद्देशिय संस्था औरंगाबाद यांना शिध्द शिघ्र गणकानुसार भाडे आकारणी करून भाडेतत्वावर देणेसाठी प्रशासकीय मान्यता झालेली आहे. त्यानुसार सदर हॉलसाठीचे क्षेत्रफळ 153.00 चौ.मी. साठी शिध्द शिघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.53,397/- एवढे होते.

त्यानुषंगाने संस्थेच्या मागणीनुसार रिलायन्स मॉल लगतच्या इमारतीमध्ये पुर्वे बाजुचा तळमजला हॉल साई सेवा बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद यांना शिध्द शिघ्र गणकानुसार भाडेतत्वावर देणेबाबतचा प्रस्ताव दि.27/02/2015 रोजीच्या स्थायी समिती सभेसमोर विषय क्र.114 अन्वये ठेवण्यात आलेला प्रस्ताव रद्द करण्यात आला. करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या फेरविचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे गारखेडा येथील न.भु.क्र.15306/1 रिलायन्स मॉल लगतचे इमारतीमधील समावेशक आरक्षण विकासातंर्गत 153.00 चौ.मी. एवढे क्षेत्र असलेला इमारत मधील पूर्वेकडील तळमजला हॉल साई सेवा बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद यांना शिध्द शिघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.53,397/- प्रमाणे देण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(महबूबखॉ पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद